महाराष्ट्र शासन

दुरध्वनी क्रं. - 02462-244474, 234504
फॅक्स क्रं. - 02462-235103

नियंत्रण कक्ष क्रं. - 02462-234720
E-mail Id- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com

जा.क्रं./ प्रेस नोट / 88 / पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड /2025 / दिनांक : 07 / 03 / 2025

# "जागतिक महिला दिनानिमित्त नांदेड पोलीस दलातर्फे विविध कार्यक्रमांचे आयोजन"

**मा. श्री अबिनाश कुमार,** पोलीस अधीक्षक नांदेड यांचे संकल्पना व मार्गदर्शनाखाली दिनांक 08 मार्च जागतिक महिला दिनानिमित्त व बेटी बचाओ, बेटी पढाओ या उपक्रमाला 10 वर्ष पुर्ण झाले त्या अनुषंगाने नांदेड पोलीस दलाचे वतीने दिनांक 08 मार्च 2025 रोजी सकाळी 08.00 वा. ते 10.00 वा. दरम्यान पोलीस अधीक्षक कार्यालय ते आयटीआय चौक येथे सावित्रीबाई फुले यांचे प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून परत त्याच मार्गावर महिला पोलीस अंलदार व इतर महिलांच्या मोटार सायकल रॅलीचे आयोजन करण्यात येणार आहे.

या सोबतच जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित मोटार सायकल रॅलीनंतर सकाळी 10.00 वा. ते 13.00 वा. दरम्यान मंथन हॉल, पोलीस अधीक्षक कार्यालय येथे पोलीस विभागातील उत्कृष्ठ कामगिरी करणाऱ्या महिला अधिकारी व अंमलदार यांचा सन्मान सोहळा कार्यक्रम व त्यांचे करीता कायदेविषयक, वैदयकीय तसेच ताणतणाव मुक्त जीवन या विषयावर मार्गदर्शन शिबीराचे आयोजन करण्यात येणार आहे.

त्यानंतर महिलांना भयमुक्त वातावरणात निर्भीडपणे संचार करता यावा यासाठी रात्री 08.00 वा. ते 10.00 वा. चे दरम्यान आयटीआय चौक ते छत्रपती शिवाजी महाराज पुतळा या मार्गाने निर्भया रॅलीचे (पथसंचलन) आयोजन करण्यात येणार आहे. **श्रीमती निती सरकार,** DRM (Divisional Railway Manager) नांदेड विभाग, **श्रीमती दलजीत कौर जज,** लिगलएड प्रमुख, या छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथे सदर निर्भया रॅलीस संबोधित करणार आहेत.

सदर कार्यक्रमामध्ये महिला, युवती, महाविदयालयीन विदयार्थींनी यांनी जास्तीत जास्त संख्येने सहभाग नोंदवावा असे आवाहन नांदेड पोलीस दलाचे वतीने करण्यात आले आहे.

**जनसंपर्क अधिकारी,**
पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड